The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संताचे व्यक्तितत्व आणि कर्तृत्व

**संशोधक विद्यार्थी : अंकुश माणिक सोनुने**
एम.ए./ एम.फिल/ सेट/ नेट/ नेटजेआरएफ / पीएच.डी स्कॉलर
विवेकानंद कला स. द. वा. व. वि. महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र भूमी ही संताच्या कार्याने पावन झालेली भूमी आहे. संत परंपरेचा वारसा हा पूर्वीपासून चालत आलेला आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर आपल्याला असे लक्षात येईल की 11 व्या शतकापासून समाजाला दिशा देणारा प्रवाह उदयाला आलेला आहे, त्यात वारकऱ्यांचा भागवत धर्म आहे. संत वचनाचा विचार केला तर अध्यात्म वेदाभ्यास, ईश्वरभक्ती यांच्या इतकाच सामाजिक विचार हा संताच्या वचनातून दिसून येतो.

संतांनी आपल्या अभंगातून, ओव्यातून, काव्यातून, सामाजिक समतेची ग्वाही दिली आहे. अस्पृश्यता हा हिनभाव आहे, आणि तो मानवी मनाशी जोडलेला आहे. त्यामुळे संतांनी मानवी मनाची स्वच्छता करण्याचे काम केले आहे.

आधुनिक काळातील संतांनी आपल्या कृतीतून आपल्या विचारातून सामाजिक परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य दाखविले आहे. संताचे विचार हे त्या काळातील आहेत तेव्हा कोणत्याही संताचे जीवन हे त्या त्या काळाशी बांधलेले होते तसेच सर्व संतांच्या कार्याच्या विचारांचा एक समान धागा कोणता असेल तर त्यांनी माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याची कृती केली. आणि ती आचरणात सुद्धा आणली आपण सारे ईश्वराचे लेकरे आहोत, म्हणून परस्परांचे बंधू आहोत जात, धर्म, वंश, पंत, यांचे पुढे जाऊन माणूस धर्माची प्रस्तावना करण्याचा प्रयत्न संतांनी केलेला आहे. यात ती धर्म नाते या विभक्ती नामाची संपत्ती होते.

*जीवा नाही येते फुल उच्चनीय भेदभाव*
*एक शुद्ध पाहत असे।।*

या संत नामदेवाच्या अभंग प्रमाणे संतांनी वातावरण निर्माण केलेले आहे. धर्म जाती विसरून सुद्धा भावनेने आपण सर्वांनी पांडुरंगाच्या चरणी लिन व्हावं यातच जीवनाचा आनंद आहे.

**संत ज्ञानेश्वर :**

संत ज्ञानेश्वर हे ब्राह्मण वर्गात जन्माला येऊनही समाजाकडून मिळालेली उपेक्षा सहन करून सुद्धा त्यांनी सामाजिक जीवनाकडे ओढ घेतली. अनेक परंपरा, जाती धर्मरूढी यामध्ये जखडून राहीलेला, उच्च वर्गाकडून शोषला जाणारा सामान्य समूहाय त्यांना दिसला ते व्यतीत होऊन त्यांनी गीतेचे तत्वज्ञान मराठीत आणण्याचा संकल्प केला आणि पुढे 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची रचना केली. ज्ञानेश्वरांच्या कार्याची कल्पना आपण करत असताना त्या वेळेच्या परिस्थितीचेही वर्णन करावे लागेल. जातीभेद व उच्च निचता समाजात खोलवर रुजली होती, अशावेळी संत ज्ञानेश्वरांनी भरकटलेल्या

समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. त्यांनी ज्ञान घेण्यापासून किती वर्ष वंचित असलेल्या समाजाला त्यांनी ज्ञानाची द्वारे खुली करण्याचे काम संत ज्ञानेश्वरांनी केले जीवनाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून देऊन समाजाला सत्याच्या वाटेवर चालण्यास प्रवृत्त करणे हे ज्ञानेश्वराचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे, सोबतच त्यांनी भागवत धर्माची आणि वारकरी संप्रदायाची स्थापना समाजात धर्म संस्कृती सदाचार यांचा प्रसार करण्याची कामगिरी या संप्रदायाने केलेली आहे. संत ज्ञानेश्वरांनी कुल, जाती, वर्ण, भेद असे ज्ञानेश्वराने मानले नाही, जीवनाकडे तटस्थपणे पाहू शकणाऱ्या ज्ञानेश्वरांनी काव्यप्रतिबाही अलौकिक आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टीची निर्मिती केली. याद्वारे समाज प्रबोधनाचे खूप मोठे कार्य केले, व समाज प्रबोधन करणारी एक मोठी फळी निर्माण केली. या कार्यास साजेशी प्रभावी व्यक्तिमत्व ज्ञानेश्वरांना लाभले होते. क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, आत्मनुभवी योगी, भुतदयावादी संत आणि प्रतिभा संपन्न कवी अशा विविध भूमिकांनी ज्ञानेश्वराचे व्यक्तिमत्व संपन्न झाले आहे. माऊलीचे पसायदान हे तर जीवनगीत आहे. हे गीत जगाच्या शांतीसाठी, मानवतेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आहे. समता, बंधुता निर्मितीचा पसायदान आधार आहे.

**संत तुकाराम :**

समाजाच्या प्रगतीसाठी आणि सामाजिक बदल घडवण्यासाठी संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी ही मोलाची भूमिका बजावते. ते अतिशय परखड विचारांचे संत होते. त्यांनी आपल्या अभंगवाणीतून समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. तत्कालीन कालखंडातील समाजाला वटणीवर आणण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण अशी भूमिका घेतली भागवत धर्माची तत्त्वप्रणाली त्यांनी आत्मसात केली. त्यातूनच त्यांनी समाजजागृती केली. संत तुकारामांनी समाजात पसरलेल्या देव-देवता विषयीच्या भापट कल्पना व अंधश्रद्धा मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. देवाकडे साकडे घालने, नवस संन्यास करणे, उपास करणे इत्यादी व्यवहारा विषयी समाजात ज्ञान प्रबोधन करण्याचे योगदान संत तुकाराम आणि स्वतः केलेले आहे. अंधश्रद्धा ही माणसाचा घात करते समाजाला शहाणी होण्यापासून रोखते आणि अज्ञानाकडे समाजाला घेऊन जाते. त्यामुळे समाजात जिवंत विचार पेरण्याचे काम तुकाराम महाराजांनी केले.

समाजातील विसंगतीवरही अभंगातून प्रहार करण्याचे काम संत तुकारामांनी केले आहे. ढोंगी लोकांचा समाचार घेताना ते म्हणतात, 'भुके नाही दान मेल्यावरती अन्न पिंडदान' यातून त्यांनी श्रद्धा घालण्याच्य प्रवृत्तीला चोप दिला. मानवी जीवनाचे कल्याण हाच खरा धर्म आहे. हे त्यांनी वेळोवेळी आपल्या अभंगवाणीतून सांगितले आहे. समाजातील बुरसटलेल्या विचारांना आळा घालण्यासाठी त्यांनी कीर्तन, प्रवचनासारखे शस्त्र हाती घेतले. शेतकरी, कामगार, भिन्नभिन्न क्षेत्रातील समाजांना जीवनवादी विचार त्यांनी दिले. संत तुकारामांच्या मते परंपरागत जात महत्त्वाची नव्हती. तर आचार-विचार भावभावना यांना त्यांनी खरे महत्त्व दिले. यामुळेच त्यांनी स्वतःला कुणबीच नाही तर महार, देखील म्हणून घेतले आहे.

संत तुकारामांनी अस्पृश्यता मानल्या गेलेल्या जातीशी स्वतः एकरूपता दाखविली आहे.

*माहारासी सिवे।।*

*कोपे ब्राहमण तो नव्हे तया प्रायश्चित काही ।*
*देहत्याग करिता नाही.।।*

संत तुकारामांच्या मते ईश्वराने निर्माण केलेले स्पृश्यअस्पृश्य होऊच शकत नाही. जातिभेदापेक्षा माणसांच्या गुणांना अधिक महत्त्व द्या. त्यामुळे सामाजिक एकोपा टिकूण राहील. संत ज्ञानेश्वरांपासून चालत आलेली विठ्ठल भक्तीची परंपरा तुकारामांनी देह एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला. त्यांचा जन्म शूद्र जातीत होऊनही त्यांनी देह वैकुंठ गमनापर्यंतचा तुकारामांचा जीवनप्रवास अलौकिक आहे. मुळात उच्चवर्णियांच्या विरोधाला त्रासला बळी न पडता तुकारामाने

*घोटवी लाळ ब्राहमज्ञाच्या हाती।*
*मुक्ता आत्मस्थिती सांडवीन।।*

असा स्वतःबद्दलचा विश्वास ठामपणे व्यक्त केला. आणि तो सार्थ करून दाखविला. सामाजिक जागृती साठी आणि भक्तीचा प्रसार करण्यासाठी त्यांना कीर्तन संस्था अधिक उपयुक्त वाटली. हरी कथा व नामसंकीर्तन हा ईश्वर प्रक्रिया सर्वश्रेष्ठ मार्ग त्यांनी मांडला. भूतदया महत्त्वाची असली तरी तुकारामांनी समाजाला डोळस भक्ती शिकवली. अंधश्रद्धावर जोरदार टीका केली, चुकीच्या कल्पनांना त्यांनी कधीही स्वतः चगी घातले नाही.

*'पाया झाला नारू।।*
*तेथे न बांधा कापूर तेथे बिवव्याचे काम।*
*अधमासी तो अधम देवावरही विंचू आला।*
*देवपूजा नावडे त्याला*
*तेथे पैजारेचे काम। अधमसी तो अधम।।*

निसर्गाशी जवळीक साधणारे संत तुकाराम महाराज त्यांनी त्याकाळामध्ये अत्यंत पुरोगामी विचार मांडले. त्याकाळी शेती हा लोकांचा मुख्य व्यवसाय होता. मग पेरणीच्या कापणीच्या वेळी कुणाचे मर्तिक झाले तर पेरणी कापणे थांबवावी लागायची आणि पेरणी कापणे ही निसर्गाची चक्रे आहे. ती त्याप्रमाणेच झाली पाहिजे, काळ माणसासाठी थांबत नाही. म्हणून त्यांनी मढे कोन करावी पेरणी' परखडपणे तुकाराम महाराज सांगतात.

*वृक्षवल्ली आम्हा सोयरे।*
*पक्षी ही सुखरे आळविती।।*

असा निसर्गाशी संवाद साधणारा मनाचा ताजेपणा व कोमलताई तुकाराम महाराजांच्या जवळ हाती महत्त्वाची असली तरी तुकारामानी समाजाला डोळसपणाची भक्ती शिकवली. देव देहात, का हो जातो देवळात. असा प्रश्नही संत तुकारामांनी केला. 'भोळ्या भाबड्या लोकांना कसवून देवाच्या नावाखाली त्यांना लुटणाऱ्या चुकीच्या मार्गाला लावणाऱ्या बुवांचे खरे स्वरूप तुकारामांनी उघड केले.'

**संत एकनाथ :**

अज्ञानी समाजाला जागे करण्याचे महत्त्वपूर्ण असे कार्य संत एकनाथांनी केले आहे. संस्कृत भाषेचे आणि ब्राम्हकार्यचे ही विषयाचे ज्ञान त्यांनी घेतले. नाथांने देवगिरी येथील जनार्दन स्वामींचा

अनुग्रह घेतला. स्वामींनी त्यांना दत्तात्रयाचे दर्शन घडविले. स्वतःच्या आचरणाने भूतदया सर्वधर्म-समभाव समानता ही तत्त्वे नाथांनी समाजाला पटविली शांततेचा आणि करुणेचा सागर असलेल्या एकनाथाबद्दल अनेक प्रकारच्या आध्यायिका सांगितल्या जातात. तीर्थयात्रा करत असताना पंचवटीस जनार्दन स्वामींच्या आज्ञेने एकनाथांनी चतु-श्लोकी भागवत हा ग्रंथ लिहिला. भागवताच्या दुसऱ्या स्कंधातील नवव्या अध्यायावर त्यांनी केलेले ही टीका आहे. पर अक्रमनामुळे महाराष्ट्रावर कठीण काळात संताचा महिमाही त्यांना वर्णन केला आहे. नाथभावतात अनेक रूपे पाहायला मिळतात.

ते देही असोनिं अहं गेही मसोनी नाही /
गृहासत्की शेखी लोकांमाजी लौकिक स्थिती/
*सुखे* लोकीकस्थिती सुंबे वरती ती लोकं सारखी//

या भागवतातून वर्तती व अज्ञ लोकांसाठी नाथांनी भागवत संप्रदायाची तत्वे एक प्रकारे विशद केली आहेत. रुक्मिणीस्वयंवर हे नाथाचे पहिलेच आख्यान काव्य आहे. मूळ भागवताच्या 'रामस्कंधातील 144 श्लोकांवर नाथांनी 18 अध्यायाचे व 1722 ओंव्याचे लोकप्रिय अध्य लिहिले आहे.

'भावार्थ रामायण' हा एकनाथांचा शेवटचा ग्रंथ यातील पहिली पाच कांवे आणि सहाव्या कांडातील 44 अध्यायाचे लेखन झाल्यावर नाथाचे देहवासा झाले. समाजाच्या जागृतीसाठी संत एकनाथ यांनी अभंग, गौळणी, भारुडे यांची रचना केली. आणि त्याचे प्रबोधन केले. संत ज्ञानेश्वराने दिलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाची शुद्धता करण्यात, सोबतच ज्ञानेश्वरांची समाधी शोधून त्यांचा जीर्णोद्धार करण्याचे कार्य एकनाथ यांनी केले.

**सारांश :**

संतसाहित्य आणि जातीभेदातील विचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत संतसाहित्याचे मुख्य प्रयोजन परमेश्वराचे गुणगान करणे. संतांनी सुद्धा मानवतेला श्रेष्ठत्व बहाल केलं आहे. जातीभेदाला सारूण सामाजिक ऐक्याची भावना जागृत करण्याचे कार्य संतांनी केलेले आहे. अनिष्ट रूढी, पद्धती मोडण्यासाठी संतांनी सामाजिक चळवळ उभी केलेली आहे. महाराष्ट्रातील अज्ञानी जनाला ज्ञानयुक्त भक्तीचा मार्ग दाखवून समाजाला सामाजिक, सांस्कृतिक जीवनात बदल घडवण्याचे महान कार्य संतांनी केलेले आहे.

**संदर्भ :**

1. गोळे रवींद्र -आधुनिक संत आणि समाज, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रथम आवृत्ती जानेवारी 2015
2. फड विजयकुमार - ज्ञानेश्वरीतील आनंद लहरी
3. तुळपुळे शं. गो पाच संतकवी
4. दातार मुकुंद - तुका म्हणे: श्री तुकारामांच्या निवडणक 366 अभंगाचे भावार्थलेखन स्नेहल प्रकाशन, पुणे.
5. पांगारकर लक्ष्मण- श्री एकनाथ महाराजांचे संक्षिप्त चरित्र, समन्वय प्रकाशन, कोल्हापुर.